Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERN!TION!L RESE!RCH FELLOWS !SSOCI!TION'S

# RESEARCH JOURNEY


**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**August-2018**

**SPECIAL ISSUE-LXII (B)**

# SAMISHA



**Executive Editor:**
Prof. Virag Gawande
Director,
**Aadhar Social Research & Development Training Institute Amravati**

**Guest Editor**
Dr.Sanjay j. Kothari
Dr. Dinesh W. Nichit
Dr. Shubhangi Dange

**Chief Editor**
**Mr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA**

Attested By
Principal

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

# जलयुक्त शिवार योजनेची भडगाव तालुक्यातील फलश्रुती

प्रा.डॉ. बी.एस. भालेराव,
अर्थशास्त्र विभाग सौ. र.ना. देशमुख महाविद्यालय, भडगाव जि. जळगाव.

जलयुक्त शिवार योजना ही मृदसंधारण आणि पाणलोट क्षेत्र विकास योजनांचे एकत्रिकरणातून निर्माण झालेली योजना आहे.या योजनेअंतर्गत विविध योजनांचे एकत्रिकरण करण्यात आले आहे अनियमित पर्जन्यमानामुळे कृषीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी टंचाईवर मात करण्यासाठी जलयुक्त शिवार योजना सुरु करण्यात आली आहे.या योजनेअंतर्गत शिवारात पडणाऱ्या पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत जिरवणे, भुगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे, विकेंद्रित पाणीसाठा निर्माण करणे इत्यादी कामे करण्यात येतात. सन २०१२-१३ मध्ये पाणीटंचाई वर मात करण्यासाठी पुणे विभागातील ५ जिल्ह्यात जलयुक्त गाव अभियान हा उपक्रम राबविण्यात आला. त्यामध्ये सर्व विभागाच्या समन्वयातून एकत्रितपणे वेगवेगळया योजना राबवून पाणी अडविण्यासाठी व भुजल पातळीत वाढ करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला त्याची चांगली फलश्रुती लाभली. या अभियानाचा विस्तार करुन पुढे सन २०१३-१४ मध्ये ही संकल्पना जलयुक्त शिवार अभियानात परिवर्तीत करण्यात आली. २०१९ पर्यंत पाणी टंचाई मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी ही योजना संपुर्ण राज्यभर राबविण्यात येत आहे.

**योजनेची उद्दीष्टये -**

१. पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाच्या शिवारात अडविणे.
२. भुगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे.
३. राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करणे, शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.
४. राज्यातील सर्वांना पुरेश्या प्रमाणात पाणी उपलब्ध करण्याची शाश्वती, ग्रामीण भागातील बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुर्नजिवीकरण करुन पाणी पुरवठ्यात वाढ करणे.
५. भुजल अधिनियम अंमलबजावणी
६. विकेंद्रित पाणी साठे निर्माण करणे.
७. पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नविन कामे हाती घेणे.
८. अस्तित्वात असलेले व निकामी झालेल्या जलस्त्रोतांची (बंधारे/गावतलाव/ पाझरतलाव/सिमेंटबंधारे) पाणी साठवण क्षमता पुर्नस्थापित करणे.
९. अस्तित्वातील जलस्त्रोतांमधील गाळ लोकसहभागातून काढून जलस्त्रोतांचा पाणीसाठा वाढविणे.
१०. वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देऊन वृक्ष लागवड करणे.
११. पाण्याच्या ताळेबंदाबाबत जनतेत जाणीव जागृती निर्माण करणे.
१२. शेतीसाठी पाण्याचा कार्यक्षम वापर करणेस प्रोत्साहन/जनजागृती करणे.
१३. पाणी अडविणे, जिरविणे बाबत लोकांना प्रोत्साहित करणे, लोकसहभाग वाढविणे.

Attested By
Principal
Sau.Rajnitai N... Deshmukh
Arts, Commerce ... College,
Bhadgaon Dist. Jalgaon (424105)

**अभियानाची व्याप्ती -**

सन २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यातील ३४ जिल्ह्यामधील एकूण ६२०५ गावे टंचाईमुक्त करण्यासाठी या योजनेअंतर्गत निवडलेली आहेत. प्रतिवर्षी ५००० गावे पाणी टंचाईमुक्त करणेबाबत शासनाचे धोरण आहे. स्वयंसेवी संस्था, लोकसहभाग व खाजगी उद्योजक यांचेकडील उपलब्ध निधीतून राज्यातील टंचाई सदृश्य तालुक्यात व उर्वरीत भागात भविष्यात टंचाई भासू नये म्हणून ही योजना राबविण्यात येत आहे.

**संशोधन पध्दती -**

प्रस्तुत लघुसंशोधन लेखात जलयुक्त शिवार योजनेची सुक्ष्म अध्ययनाकरीता भडगाव जि. जळगाव मधील आंचळगावाची निवड करण्यात आली आहे. या गावातील एकूण ५ वैयक्तीक लाभार्थ्यांची निवड करुन त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत व शेततळयांचे निरीक्षण करुन माहिती नोंदविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे

तालुका कृषी कार्यालय भडगाव येथील कृषी अधिकारी यांची मुलाखत घेण्यात आली तसेच प्रकाशित व अप्रकाशित अहवाल यांचा आढावा घेण्यात आला आहे.

**संशोधन लेखाची मर्यादा -**

हा संशोधन लेख केवळ भडगाव तालुक्यात पुरताच मर्यादित आहे. वर्ष २०१४-१५ या वर्षाची संशोधना करीता निवड करण्यात आली आहे. या वर्षात भडगाव तालुक्यात केवळ आंचळगाव शिवारातच जलयुक्त शिवार अभियानात कामे घेण्यात येणार आहे म्हणून या गावाची संशोधनाकरीता निवड करण्यात आली आहे.

**विश्लेषण -**

जळगाव जिल्ह्यातील भडगाव तालुका हा जिल्ह्याच्या दक्षिणेस आहे. संशोधनाकरीता निवडलेले गाव आंचळगावाचे एकूण क्षेत्रफळ ४३३.४५ हेक्टर असून या गावात एकूण ३२४ घरे असून गावाची एकूण लोकसंख्या १५३९ आहे ज्यामध्ये ४०० पुरुष ७३९ महिला आहेत. गावामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरेश्या प्रमाणात व्यवस्था नाही. (जनगणना २०११)

एकूण जमिनीखालील क्षेत्रफळ ३३४.३ हेक्टर असून ४० हेक्टर क्षेत्रफळावर जलसिंचन सुविधा उपलब्ध नाहीत.

जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत २०१४-१५ या वर्षात घेण्यात आलेली कामे

| अ.क्र. | कामाचे नाव | संख्याक्षेत्र (हेक्टर) | एकूण खर्च (लक्ष रु.) |
|---|---|---|---|
| १ | कंपार्टमेंट बंडिंग | २९६.४९ | १५.३३ |
| २ | शेततळे (वैयक्तीक) | ५ | ८.८९ |
| | एकूण | ३०१.४९ | २४.२२ |

**स्त्रोत : तालुका कृषी कार्यालय भडगाव.**

आंचळगाव शिवारात २०१४-१५ या वर्षात कंपार्टमेंट बंडिंग चे काम २९६.४९ हेक्टर मध्ये घेण्यात आले त्यामध्ये एकूण १५.३३ लाख रुपये खर्च करण्यात आले तसेच वैयक्तीक ५ शेततळे बांधण्यात आली. यावर ८.८९ लाख रुपये खर्च करण्यात आली.

**मुल्यांकन -**

वैयक्तिक शेततळयांचे व कंपार्टमेंट बंडिंगचे निरीक्षण व शेतकऱ्यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून माहिती गोळा करुन खालील निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

१.बांधलेल्या शेततळयांमध्ये अपुर्ण मेनकापड आढळून आला. सर्व ५ ही शेततळे अपुर्ण अवस्थेत दिसून आले.

२.तांत्रिक बाबतीत योजनेमध्ये अनेक अडचणी दिसून आल्यात.

३.सर्व शेततळे पाण्याअभावी कोरडी होती.

४.या योजनेमध्ये लोकसहभागाचा अभाव दिसून आला.

५.पाण्याच्या ताळेबंदाबाबत जनतेत जाणीव जागृती करण्यात कृषी सहाय्यक, कृषी अधिकारी कमी पडल्याचे दिसून आले. लोकांन ही योजना केवळ सरकारी वाटते. या योजने विषयी त्यांच्यामध्ये आपुलकी दिसून येत नाही. गावातील बहुतांश लोक योजनेपासून अनभिज्ञ आहेत. त्यामुळे गाळ काढणे, विकेंद्रित पाणी साठे निर्माण करणे, जलस्त्रोतांचा पाणीसाठा वाढविणे इत्यादी कामात लोकांचा सहभाग अत्यल्प आहे.

६.योजनेअंतर्गत कामाची आखणी करतांना स्थानिक, राजकिय पुढाऱ्यांच्या सोयीप्रमाणे कामे करण्यात आल्याचे दिसून आले.

७.लाभार्थी निवडीबाबत योजनेमध्ये राजकिय, इच्छाशक्तीला किंवा राजकिय नेत्यांच्या जवळील लोकांना लाभ देण्यात आले.

**समारोप -**

मृदा व जलसंधारणाबाबत योजना कितीही चांगली असली तरीही त्या योजनेचे यश हे निसर्गावर अवलंबून असते. सर्वेक्षित गावात या योजनेच्या माध्यमातून चांगले काम झालेले असले तरीसुध्दा पाऊस न आल्यामुळे योजना असफल ठरली म्हणून जलसंधारणाबाबतीत कोणत्याही योजनेची फलश्रुती समजण्यासाठी खुप काळ जाऊ द्यावा लागतो. मर्यादित कालखंडात तीचे यश दृष्टीक्षेपात पडत नाही. योजनेची फलश्रुती ही त्या योजनेत लोकांचा सहभाग व प्रसिध्दी या घटकांवर अवलंबून असते. म्हणून या योजनेत लोकांना अधिकाधिक प्रमाणात सहभागी करुन घेणे आवश्यक आहे तसेच प्रसिध्दीकरण सुध्दा आवश्यक आहे. ही योजना एटीएम सारखी आहे. ज्याप्रमाणे एटीएम मधून आपण पाहिजे तेवढे पैसे काढू शकतो त्याचप्रमाणे शेततळयांच्या माध्यमातून शेतकरी हवे तेवढे पाणी वापरुन पीक घेऊ शकतात. ही योजना शेतकऱ्यांसाठी वरदान आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) अर्थसंवादचे अंक
२) विकल्पवेध - पाक्षिकांचे वेगवेगळे अंक
३) योजना - मासिक
४) भारतीय अर्थव्यवस्था - श्रीधर देशपांडे, विनायक देशपांडे
५)जळगांव जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन. (२०१२-१३)

RESEARCH JOURNEY

Attested By
Principal
Sau.Rajnitai N. ... Deshmukh
Arts, Commerce ... College,
Bhadgaon Dist. Jalgaon (424105)

ISSN : 2348-7143
June 2019

# जळगाव जिल्ह्यातील मध्यान्ह भोजन योजनेचे अध्ययन

प्रा. बी. एस. भालेराव
अर्थशास्त्र विभाग, सौ. र. ना. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भडगांव, जि. जळगांव

**प्रस्तावना :** प्राथमिक शिक्षण हे सर्व प्रकारच्या शिक्षणाचा पाया असल्याने त्याचा मुलभूत हक्कांमध्ये समावेश केला आहे. भारतामध्ये वाढत्या वयाच्या मुलांमध्ये कुपोषणाची समस्या आढळते. याचा परिणाम प्राथमिक शिक्षणावर होत असून भारत सरकारचे उद्दिष्ट साध्य करण्यात अडथळे येऊ लागल्याने भारत सरकारने संबंधित मुलांची उपासमार थांबविण्यासाठी व शाळेतील मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी जाहीर केलेली शालेय पोषण आहार योजना महाराष्ट्र राज्यात शालेय शिक्षण विभागाने दि. २२नोव्हे.१९९५ रोजी शालेय पोषण आहार योजना इयत्ता १ली ते ५वी साठी टप्याटप्याने सुरु केली आहे. तसेच दि. ८आक्टो.२००८ रोजी इयत्ता ६वी ते ८वी साठीही लागू करण्यात आली. शालेय पोषण आहार योजनेत अंमलबजावणी करणाऱ्या संबंधित घटकांमध्ये सर्वात महत्वाचा घटक हा मुख्याध्यापक आहे.

भारतातील तामीळनाडू हे प्रथम राज्य आहे. ज्याने मद्यान्ह भोजन योजना सर्वप्रथम सुरु केली. विषेशतः तामीळनाडूचे मुख्यमंत्री थीरु.के. कामराज यांनी अधिकारी, सांसद, पत्रकार यांचा रोष पत्करुन ही योजना सुरु ठेवली. नंतरच्या काळात ही योजना लोकप्रिय झाली. १९२८ मध्ये केशव ॲकेडमी कोलकाता यांनी मध्यान्ह भोजन योजनेमध्ये मुलांना जेवणाचा डबा आवश्यक केला. त्याचे चार आने प्रतीमहिना घेण्यात येत होते. शाळेतील जेवण कार्यक्रम (School lunch program) केरळमध्ये १९४१ मध्ये सुरु करण्यात आला. १९४२ मध्ये बॉम्बे (मुंबई) मध्ये ही योजना कार्यान्वित करण्यात आली. UNICEF ने ६ ते १३ वर्षापर्यंतच्या मुलांना दुध पावडर मोफत पुरविण्यात आले. १९४६ मध्ये बँगलोर शहरात शिजवलेला भात व दही पुरविण्याची योजना सुरु करण्यात आली.१९५३ मध्ये उत्तरप्रदेश सरकारने अशाच प्रकारची योजना सुरु केली. ज्यामध्ये शिजवलेले अन्न, शेंगदाने, शिजवलेला भात, बटाटे किंवा मौसमी फळ इत्यार्दी देण्याचे ठरविण्यात आले. गुजरात राज्यामध्ये १९८४ मध्ये मध्यान्ह भोजन योजना सुरु करण्यात आली. ऑगस्ट १९९० ते ऑक्टोंबर १९९१ या काळात मध्यान्ह भोजन योजना शिक्षण कार्यक्रम अन्नाकरीता मध्ये परिवतीZत करण्यात आली. ज्यामध्ये ७०% हजर विद्यार्थ्यांना १० कि.ग्रॅ. अन्नधान्य मोफत देण्यात आले. केरळमध्ये १९८४ मध्ये MDM ही योजना राबविण्यास सुरुवात केली. २२२ गावांमध्ये पुर्व माध्यमिक शाळांमध्ये ही योजना राबविण्यात आली. १९८५ या वर्षी या योजनेचा विस्तार करण्यात आला. इयत्ता १ ते ५ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत भोजन पुरविण्याची व्यवस्था करण्यात आली. मध्यप्रदेश, ओरिसा या राज्यांमध्ये सुध्दा १९९०-९१ पासून या योजनेला प्रारंभ झाला. मध्यप्रदेश आणि राजस्थान सरकारने आंतराष्ट्रीय संघटनांच्या सहाय्याने हा कार्यक्रम राबविला.

केंद्रशासनाने १९५८-५९ मध्ये FAO,WHO,UNICEF यांच्या सहकार्याने पोषण कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. चर्च वर्ल्ड सर्विस (church world Service) को-ऑपरेटिव ऑफ अमेरिकन रिलीफ एव्हरीव्हेअर (Co-operative of American Relief Everywhere) UNICEF इत्यादिंच्या सहकार्याने ही योजना काही प्रमाणात कार्यान्वित करण्यात आली. १५ ऑगस्ट १९९५ मध्ये पोषण विषयक राष्ट्यीय कार्यक्रम (प्राथमिक शिक्षणाकरीता) (NP-NSPE) सुरु करण्यात आली. ही योजना २४०८ खंडामध्ये राबविण्यात आली. १९९७ - ९८ मध्ये संपुर्ण भारतभर ही योजना राबविण्यात सुरुवात झाली. या योजनेंतर्गत शिजविलेले मध्यान्ह भोजन ३०० कॅलरीज आणि १२ ग्रॅम प्रोटीनयुक्त अन्न इयत्ता १ ते ५ पर्यंतच्या विद्यार्थ्यांना पुरविण्याचे ठरविण्यात आले. याच योजनाला मध्यान्ह भोजन योजना (MDM) असे संबोधन्यात येवू लागले.

महाराष्ट्य राज्यामध्ये १९९६-९७ मध्ये २७ जिल्ह्यातील २०० शाळांमध्ये ही योजना राबविण्यास सुरुवात झाली. १९९७-९८ मध्ये २९ जिल्ह्यातील ३०० शाळांमध्ये ही योजना राबविण्यात आली. १९९९-२००० मध्ये मुंबईचा भाग योजनेत समाविष्ट करण्यात आला. शालेय शिक्षण विभागाच्या वतीने मध्यान्ह भोजन योजना (MDM) जानेवारी २००३ पासून कार्यान्वित करण्यात आली. ही योजना इयत्ता १ ते ५ वी पर्यंतच्या शासकीय, शासकीय अनुदान प्राप्त खाजगी शाळा, वस्तीशाळा, महात्मा फुले शिक्षण गॅरंटी योजना केंद्र इत्यादी ठिकाणी राबविण्यात येत आहे. शालेय शिक्षण विभागाच्या सुचनेनुसार खिचडी, दाळभात, इडली सांभार, खीर, टॉमेटो भात, पालेभाजी-भात इत्यादी. भोजन पुरविण्यात येत आहे. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांना ८० टक्के उपस्थितीनुसार दरमहा ३ किलो याप्रमाणे शैक्षणिक वर्षातील १० महिन्यासाठी तांदळाच्या पिशव्यांचे वाटप केले जात होते परंतु २००१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाकडून शाळेतील विद्यार्थ्यांना दुपारचे भोजन देण्याचे आदेश शासनास देण्यात आले. त्यामुळे तांदूळ शिजवून देण्यात आले.२००२ पासून राज्यातील आदिवासी भागात तर २००३ पासून राज्यातील उर्वरित अनुदानित शाळांमध्ये तांदूळ देण्यास सुरवात



Attested By
Principal
Sau.Rajnitai ... Deshmukh
Arts, Commerce ... College
Bhadgaon Dist. Jalgaon

ISSN : 2348-7143
June 2019

झाली. यात सर्व शाळांमधील प्रतिविद्यार्थ्यांना प्रतिदिन १०० ग्रॅम तांदळाबरोबर इतर पुरक पदार्थ मिसळून दुपारचा पोषण आहार देणे सुरु केले.

२००७-२००८ मध्ये शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या काही जिल्ह्यातील काही गटामध्येही योजनेचा विस्तार झाला. यात राज्याच्या १० जिल्ह्यांच्या ४३ तालुक्यातील इ. ६वी ते ८वी च्या विद्यार्थ्याकरीता त्यानुसार ही योजना राज्यांमध्ये दि. १ जानेवारी पासून सुरू झाली. ही योजना संपुर्ण राज्यामध्ये १ सप्टेंबर २००८पासून झाली.

सदर योजनेत इ ६वी ते ८वी च्या प्रतिविद्यार्थ्यांना प्रतिदिन १५० ग्रॅम तांदळाबरोबर इतर पूरक पदार्थ मिळून दुपारचा आहार देण्याचे ठरले. या आहारातून ७०० कॅलरीज व १२ ग्रॅम प्रोटीन्स मिळाले पाहिजेत असे आदेश शासन निर्णयानुसार देण्यात आले आहेत. अन्न शिजवून देण्यासाठी केंद्रशासन आणि राज्यशासन यांच्याकडून खाली दर्शविल्याप्रमाणे प्रतिविद्यार्थी अनुदान देण्यात येत आहे.

| | केंद्रशासनाकडून | राज्याकडून | |
|---|---|---|---|
| १ ली ते ५ वी | १.५८ | ०.५० | = २.०८ |
| ६ वी ते ८ वी | २.१० | ०.५० | = २.६० |

**योजनेची उद्दिष्टे :**

- प्राथमिक शाळांमधील पटनोंदणी वाढावी.
- प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती वाढावी.
- मुलांनी शाळेत पुर्णवेळ उपस्थित राहावे.
- विद्यार्थ्यांमध्ये सर्वधर्म समभाव विकसित व्हावा.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन हे वर्णनात्मक पद्धतीवर आधारीत आहे. द्वितीय समंक हे प्रकाशित-अप्रकाशित अहवाल, विविध संदर्भ ग्रंथ इत्यादींचा अभ्यास करुन माहिती संकलित केली. प्राथमिक संकलनासाठी जळगाव जिल्ह्यातील पारोळा, भडगाव , चाळीसगाव, पाचोरा तालुक्याची अध्ययनासाठी निवड केली. प्रत्यक्ष सर्वेक्षणाच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले. या तालुक्यामधील प्रत्येकी ५ गावांची दैव नमुना पद्धतीने निवड करण्यात आली. प्रत्येक गावातील पाच शाळांची निवड करण्यात आली.

**निष्कर्ष :**

जळगाव जिल्ह्यातील सर्वेक्षित पंचायत समितीमध्ये गावांच्या मुलभूत सांख्यिकीचे अध्ययन केल्यास असे निदर्शनास येते की, पारोळा पंचायत समितीतील सर्वेक्षित पाच गावांमध्ये एकूण लोकसंख्या ११७४२ एवढी असून त्यामध्ये एकूण पुरुषांची संख्या ६१७७ तर एकूण महिलांची संख्या ५५६५ इतकी आहे. या गावांमध्ये अनुसूचित जातीची एकूण लोकसंख्या ७१४ असून अनुसूचित जमातींची लोकसंख्या १८२२ इतकी आहे. भडगाव पंचायत समितीतील सर्वेक्षित पाच गावातील एकूण लोकसंख्या १४८३४ इतकी असून त्यामध्ये एकूण पुरुष ७७५६ तर एकूण ७०७८ आहे. या गावांमध्ये एकूण अनुसूचित जातीची लोकसंख्या १५२१ एवढी असून अनुसूचित जमातीची लोकसंख्या २३९२ एवढी आहे. चाळीसगाव पंचायत समितीतील सर्वेक्षित पाच गावातील एकूण लोकसंख्या १७०४० एवढी असून त्यामध्ये पुरुषांची लोकसंख्या ८९२८ तर महीलांची संख्या ८११२ आहे. या गावांमध्ये अनुसूचित जातींची एकूण लोकसंख्या १२६३ असून अनुसूचित जमातींची लोकसंख्या १६४७ आहे. पाचोरा पंचायत समितीतील सर्वेक्षित पाच गावातील एकूण लोकसंख्या २०५४२ असून त्यामध्ये पुरुषांची संख्या १०६७७ तर महिलांची संख्या ९८६५ आहे. या गावांमध्ये अनुसूचित जातीची एकूण लोकसंख्या ११४२ असून अनुसूचित जमातीची लोकसंख्या २७६२ आहे. सर्वेक्षित २० गावांची एकूण लोकसंख्या ६४१५८ असून त्यामध्ये पुरुषांची ३३५२८ तर महिलांची संख्या ३०६२० आहे. या गावांमध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या ४६४० असून अनुसूचित जमातीची लोकसंख्या ८६२३ आहे.

सर्वेक्षित पारोळा पंचायत समितीतील पाच गावातील एकूण शासकीय प्राथमिक शाळांची संख्या ८ असून ४ शासकीय माध्यमिक शाळा आहेत. या गावांमध्ये १ खाजगी माध्यमिक शाळा तर ४ शासकीय उच्च माध्यमिक शाळा आहे. भडगाव पंचायत समितीतील सर्वेक्षित पाच गावांमध्ये ९ शासकीय प्राथमिक शाळा आहे. तर ६ शासकीय माध्यमिक शाळा आहेत. चाळीसगाव पंचायत समितीतील सर्वेक्षित गावात एकूण ८ शासकीय प्राथमिक शाळा तर ५ शासकीय माध्यमिक शाळा आहे. या गावांमध्ये एकही